C/399

**ऊर्जा संवर्धन कार्यक्रम.**
निष्कासित उष्णतेचे पुनरुज्जीवन योजना थेट
बीज निर्मिती प्रकल्पासह गरम पाणी करणे,
प्रक्रियेचे तापमान वाढविणे, बॉयलरची व प्रक्रियेची
इनलेट हवा व पाणी गरम करण्याची योजना.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्र. अपाऊ-२००७/प्र.क्र.५९० /ऊर्जा ७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक :- १३ मार्च ,२००८**

वाचा:- शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
क्रमांक -अपाऊ २००७/प्र.क्र.५९०/ऊर्जा-७
दि. ११ सप्टेंबर, २००७.

**प्रस्तावना:** ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांतर्गत निष्कासित उष्णतेचे पुनरुज्जीवन करुन त्यापासून वीज निर्मिती प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य देएयासाठी उपरोक्त दिनांक ११ सप्टेंबर,२००७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. मान्यता देण्यात आलेल्या योजनेतील थेट वीज निर्मितीचे प्रकल्प सद्य: स्थितीत बिकट असल्याचे व त्यास बराच कालावधी लागणार आहे. ऊर्जा संवर्धन ही काळाची गरज ओळखून केंद्र शासनाने “ ऊर्जा संवर्धन कायदा २००१” हा अधिनियम पारित केला असून, त्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागाची आहे. तेव्हा ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांतर्गत निष्कासित ऊर्जा पुनरुज्जीवन करणे, त्याचा वापर इतर कामासाठी जसे गरम पाणी करणे, प्रक्रियेचे तापमान वाढविणे यासाठी केल्यास मोठ्या प्रमाणावर इंधनाची बचत होऊन तसे प्रकल्प महाऊर्जाकडे सादर करण्यात यावेत ,याकरिता सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मागील काही दशकांपासून महाराष्ट्र राज्य हे उद्योग क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिलेले आहे. आजमितीस महाराष्ट्र राज्यात जवळजवळ १५,००० पेक्षा जास्त उद्योग हे अति उच्च दाब

MEDA-PUNE

असलेल्या विद्युत ऊर्जेवर कार्यरत आहेत. तसेच राज्याची विद्युत ऊर्जा निर्मितीची स्थापिय क्षमता ही देशात सर्वात अधिक आहे. महाराष्ट्रात मुख्यत्वे करुन सिमेंट, पोलाद, रसायन, औषध निर्माण उद्योग मोठ्या प्रमाणात आहेत. महाराष्ट्राच्या सर्व विभागांमध्ये रसायन तयार करणाऱ्या उद्योगांचे स्वतंत्र झोन अस्तित्वांत आहेत. तसेच विदर्भ महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक खनिजांवर आधारित उद्योगधंदे कार्यरत आहेत. या अशा अनेक उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. सदर निष्कासित उष्णतेचे पुर्नजीवन होत असते त्यामुळे ऊर्जेचा मोठ्या प्रमाणात उपव्यय होत आहे. सदर निष्कासित उष्णतेचे पुर्नजीवन केले असता, त्यापासून विद्युत ऊर्जा निर्मिती केली जाऊ शकते.तसेच निष्कासित उष्णतेचा वापर इतर कामांसाठी जसे पाणी गरम करणे, प्रक्रियेचे तापमान वाढविणे यासाठी केल्यास मोठ्या प्रमाणावर इंधनाची बचत होऊ शकते व त्यामुळे ऊर्जा बचत होऊन कार्यक्षमता देखील वाढीस लागू शकेल.

२. महाराष्ट्रात निष्कासित उष्णतेचे पुर्नजीवन करणारे प्रकल्प अस्तित्वात आले तर सुमारे ३५० मेगावॅट एवढ्या वीजेची निर्मिती होऊ शकते. तसेच निष्कासित उष्णतेचा वापर इतर कामांसाठी जसे पाणी गरम करणे, प्रक्रियेचे तापमान वाढविणे, बॉयलरची व प्रक्रियेची इनलेट हवा व पाणी गरम करणे यासाठी केल्यास मोठ्या प्रमाणावर इंधनाची बचत होऊ शकते व ही बचत विद्युत ऊर्जेच्या बचतीच्या समप्रमाणात ऊर्जा बचत होईल. या योजनेंतर्गत उद्योगांना निष्कासित उष्णतेच्या पुर्नजीवनावर आधारित प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी काही प्रमाणात अनुदान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजना खाजगी उद्योग, सहकारी उद्योग, शासकीय व निमशासकीय उद्योग, स्थानिक स्वराज्य संस्था इ. साठी राबविली जाईल.

४. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जा संदर्भित क्षेत्रातील तज्ज्ञ संस्थांची नोंदणी करुन त्याव्दारे योजनेचा प्रचार व प्रसार केला जाईल. तसेच सदर संस्थाव्दारेच योजनेची अंमलबजावणी केली जाईल. लाभार्थी संस्थांनी त्यांचे प्रस्ताव महाऊर्जाकडे नोंदणीकृत असलेल्या तज्ज्ञ संस्थांमार्फतच सादर करण्यात येईल. या योजनेमध्ये प्रथम प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेस

प्रथम प्राधान्य देण्यात येईल. तसेच लाभार्थी संस्था निवडीचे निकष महाऊर्जामार्फत तयार करण्यात येतील व त्या निकषांच्या आधारावरच योजनेचे अनुदान वाटप करणेत येईल.

५. वरील सर्व योजनांसाठी लागणारी आर्थिक तरतूद शासनातर्फे महाऊर्जास प्राप्त होणाऱ्या निधीतून राबविण्यात यावी. तसेच आवश्यकता भासल्यास महाऊर्जा निधीतून खर्च करण्यास मुभा राहिल.वरील योजनांची अंमलबजावणी विषयी महाऊर्जा शासनास प्रगती अहवाल सादर करेल. तसेच वर्षाअखेरीस मूल्य मापन करुन आवश्यक ती दुरुस्तीसाठी प्रस्ताव शासनास सादर करेल.वरील सर्व योजनांसाठी आर्थिक तरतूद करण्याचे अनुदानाचे निकष ठरविण्याचे तसेच तांत्रिक बाबी निश्चित करण्याची जबाबदारी महाऊर्जाची राहिल.

६. यासाठी होणारा खर्च २०१० वीज- अपारंपरिक ऊर्जा साधने/एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम या मुख्य लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु. दि. पारधी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

- महासंचालक,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ,पुणे
- सर्व जिल्हाधिकारी.
- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
- सर्व विभागीय आयुक्त.
- महालेखापाल ,म.रा.मुबई/नागपूर
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
- खाजगी सचिव, मा.मंत्री, (ऊर्जा)

E:\AP-1\pandit\g.r\590.doc